**नियमित दिवाणी दावा क्र. २३/२०२१.**

**पवन मांडवकर व अन्य वि. सुनिल चव्हाण व इतर**

**CNR No.- MHYA180004532021.**

## <u>निशाणी क्र.१०७ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०६ याने मुळ प्रतिवादीं क्र. ०१ ते ३५ यांनी दाखल केलेला प्रतिदावा वगळणेबाबत तसेच त्यांना स्वतंत्र दावा दाखल करणेबाबत आदेशीत करणेकरीता दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.०६ याचे कथन आहे की, मुळ वादीने मुळ प्रतिवादी क्र. ०१ ते ३७ यांचे विरूध्द दावा दाखल केला आहे. प्रकरणी हजर झाल्यानंतर मुळ प्रतिवादी क्र. ०१ ते ३५ यांनी मुळ वादी क्र.०१ व ०२ तसेच इतर व्यक्ती नामे भगवान मांडवकर, केशव कोष्टे, आप्पाजी मांडवकर आणि उदय आडे यांच्या विरूध्द घोषणेकरीता व कायम मनाई हुकूमाकरीता प्रतिदावा दाखल केला आहे. नियोजीत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०६ हे मुळ दाव्यात पक्षकार नाहीत. तसेच त्यांचा दावा मिळकतीच्या मालकीशी काही संबंध नाही. प्रतिवादी हे मुळ वादी विरूध्द प्रतिदावा करू शकतात. तथापी, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०६ हे मुळ दाव्यात पक्षकार नाहीत. तसेच त्यांचा दावा मिळकतीच्या व्यवकारांशी संबंध नाही. त्यामुळे प्रतिदावा वगळणे आवश्यक आहे. प्रतिदाव्यातील वादीने स्वतंत्र दावा दाखल करून दाद मागणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रतिदावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ०८ नियम ०६-अ च्या तरतुदी विरुध्द आहे. सबब, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०६ याने मुळ प्रतिवादीं क्र.०१ ते ३५ यांनी दाखल केलेला प्रतिदावा वगळणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिदाव्यातील वादींच्या वतीने निशाणी क्र. १०९ वर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. प्रतिदाव्यातील वादींच्या वतीने कथन आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी महाराष्ट्र राज्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ०८ मध्ये नियम ११ ते ३० यांची भर घातली आहे. त्या सुधारणेनुसार नियम २३ ते ३० मध्ये त्रयस्थ पक्षकारा संबंधी तरतुद आहे. त्यानुसार, मुळ दाव्यात पक्षकार नसलेल्या व्यक्तिस प्रतिदाव्यात पक्षकार करता येते. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०३ ते ०६ हे दाव्यातील मालमत्ते संबंधी वादीस

मदत करणारे संबंधीत व्यक्ति आहेत. त्यामुळे अर्ज खारीज करणेबाबत विनंती केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो...** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :-**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा कायम मनाई संदर्भात आहे. प्रतिदावा घोषणेकरीता व कायम मनाई हुकूमाकरीता आहे. दावा व प्रतिदावा मिळकत गट क्र. ८०/१ आहे. वाद मिळकत स्थावर मालमत्ता आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मुंबई उच्च न्यायालय सुधारणा नूसार कलम ११ ते ३६ समाविष्ट करण्यात आले. त्यामधील त्रयस्थ पक्षकार कार्य पध्दती कलम २३ मध्ये स्पष्ट केले आहे की, प्रतिवादी त्रयस्थ व्यक्ती विरुध्द की, जो दाव्यात पक्षकार नाही त्या विरुध्द दाद मागू शकतो. संबधीत न्यायालय अशा व्यक्तीस विहित नमून्यामध्ये नोटीस जारी करु शकते. त्यावरुन हि बाब स्पष्ट होते की, प्रस्तुत प्रकरणी प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे मूळ दाव्यात पक्षकार नसले तरी त्यांना प्रतिदाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करता येईल. तसे केल्यास प्रकरणांची गुंतागुंत टळणार आहे व न्यायदान करणे सुलभ होणार आहे. त्यामूळे अर्ज नामंजूर केल्यास प्रस्तुत अर्जदाराचे काही नूकसान होणार नाही. या उलट, अर्ज मंजूर झाल्यास नियोजित प्रतिदाव्यातील प्रतिवादींना नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणाएका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, न्यायदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## आदेश

१) प्रतिवादी क्र. ६ याचा अर्ज निशाणी क्र.१०७ नामंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– ०५/०१/२०२३.

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
घाटंजी, जि. यवतमाळ.